# जिल्हा होमगार्ड कार्यालय जालना .

पोलीस मुख्यालयाचे मागे,पोलीस दवाखाना

ई मेल – dchgjalna@yahoo.com

जा.क्र. : २५८/प्रशि/२०२४

दिनांक : १८/०७/२०२४

प्रती,
मा. जिल्हा माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय,
जालना.

विषय : नविन होमगार्ड सदस्य् नोंदणी कार्यक्रमाची बातमी वृत्तपत्रातुन विनामुल्य प्रसिध्दीस देणे बाबत...

संदर्भ : मुख्यालयाचे पत्र क्र. मस/कार्या ०३/१४३२. दि. ०९/०७/२०२४

महोदय,

उपरोक्त् संदर्भीय विषयान्वये आपणांस कळविण्यांत येते की, होमगार्ड ही मानसेवी संघटना असुन देशसेवेच्या भावनेने कार्य करते.जालना जिल्हा होमगार्डच्या अधिपत्याखालील पथक/उप पथकांमध्ये लक्षसंख्येनुसार अनुशेष भरणे करीता होमगार्ड नोंदणीचे आयोजन करण्यांत येत असुन जिल्हयातील पुरुष व महिला ऊमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मार्गावण्यांत येत आहे. त्याबाबतची खालीलप्रमाणे बातमी जिल्हयातील सर्व वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द् करण्यांत यावी. हि विनती.

## प्रेसनोट

जालना जिल्हा होमगार्ड मधील विविध पथकांच्या ठिकाणी रिक्त असलेल्या १९५ नविन होमगार्ड सदस्य नोंदणी करण्याचे आयोजन केलेले आहे. या करीता दि.२८/०७/२०२४ ते १७/०८/२०२४ चे सायं. ०५:०० वाजेपावेतो ऑनलाईन अर्ज मागविणेत येत असुन होमगार्ड नोंदणीचे माहितीपत्रक नियम व अटी या बाबत विस्तृत माहिती https:/maharashtracdhg.gov.in/mahahg/login१.php या संकेत स्थळावर उपलब्ध् आहे. होमगार्ड पात्रतेचे निकष पुढीलप्रमाणे असतील.कमीत कमी १० वी उत्तीर्ण.वय २० ते ५० वर्ष.उंची पुरुषाकरीता १६२ से.मी व महिलाकरीता १५० से.मी.संबधित उमेदवारांस विहीत केलेल्या वेळेत धावणे व गोळाफेक शारिरीक चाचणी दयावी लागेल. तरी होमगार्ड मध्ये सेवा करु इच्छीत असलेल्या जालना जिल्हयातील रहीवासी उमेदवारांनी नोंदणी करीता अर्ज करावा असे आवाहन करण्यांत येत आहे.

(आयुष नोपाणी)
जिल्हा समादेशक होमगार्ड तथा,
अपर पोलिस अधिक्षक जालना.